**पुस्तिका – 4**

**कार्य पार पाडण्याकरीता विहित पद्धत / प्रमाण**

**किटकनाशक विभाग**

| अ.क्र क्र | पद | कर्तव्य पार पाडण्यासाठी निश्चित केलेली प्रमाणके. |
|---|---|---|
| 1) | किटक नियंत्रण अधिकारी | प्रत्येक विभागासाठी एक पद. |
| 2) | पर्यवेक्षकिय कनिष्ठ अवेक्षक | प्रत्येक विभागासाठी एक पद. |
| 3) | कनिष्ठ अवेक्षक (रोगवाहक डास नियंत्रण) | ए) शहर<br>1) प्रत्येक दिवशी 40 मजले चढून इमारतीवरील टाक्या तपासणे.<br>2) इमारत बांधकामे व जमिनीवरील डासजन्य ठिकाणे व अळया साठी फवारणी कामावर पर्यवेक्षण करणे.<br>3) सर्व प्रकारच्या डास जातीच्या अळया नष्ट करण्यासाठी क्रुसेड कार्यक्रमात सहभागी होणे.<br>ब) उपनगरे<br>1) उपनगरातील विभागांमध्ये प्रत्येक दिवशी पाच इमारतींच्या टाक्या तपासणे.<br>2) इमारत बांधकामातील व जमिनीवरील डासजन्य ठिकाणांवर अळीनाशक कारवाईचे पर्यवेक्षण करणे.<br>3) सर्व जातीच्या डासांचे निर्मुलन / डास विरोधी क्रुसेड वा खास मोहिमेत सहभागी होणे. |
| 4) | कनिष्ठ अवेक्षक (मुषक) | 1) 30 वंडर रॅट ट्रॅप / पिंजऱ्यांचे प्रत्येक कामगाराला वाटप करून क्षेत्रामध्ये त्यांचे पिंजरे व कामकाज तपासणे<br>2) प्रत्येक दिवशी प्रत्येक कामगाराकडून 200 उंदरांच्या बिळात मूषक अमिष पेरणे / विषारी धुराची उपाययोजना करणे.<br>3) परिस्थितीनुसार मोठया संख्येने उंदराचे सापळे लावणे.<br>4) वेगवेगळया सर्व कार्यवाहीतून मृत झालेले उंदीर गोळा करून योग्य विल्हेवाट लावणे. |
| 5) | धुम्रफवारणी दुय्यम निरिक्षक | प्रत्येक धुम्रफवारणी पथकासाठी एक धुम्रफवारणी दुय्यम निरिक्षक.<br>1) प्रत्येक पाळीत प्रत्येक कामगाराकडून चार धुम्रफवारणी यंत्रे भरून फवारणी करणे. |

| | | |
|---|---|---|
| | | 2) पेट्रोल व डिझेल महापालिका गॅरेजमधून आणून त्याचा हिशेब ठेवणे, धुम्रफवारणी यंत्राची योग्य ती देखभाल ठेवणे. |
| 6) | रोगाणुनाशक दुय्यम निरिक्षक | एक रोगाणुनाशक दुय्यम निरिक्षक प्रती विभाग.<br>किटकनाशक फवारणीची देखरेख करणे.<br>1) क्षेत्रामध्ये दहा बादल्या भरून (100 लिटर) किटकनाशक द्रावण प्रति पाळी प्रतिदिन फवारणी करणे.<br>2) क्षेपण भूमीवर<br>दहा बादल्या भरून (100 लिटर) किटकनाशक द्रावण प्रति पाळी प्रतिदिन फवारणी करणे. |
| 7) | वरिष्ठ क्षेत्र कार्यकर्ता | 1) मुषक नियंत्रण -<br>मुषक नियंत्रणाकरीता नेमून दिलेल्या कर्मचा-यांवर देखरेख करणे.<br>2) हत्तीरोग / नाले -<br>नेमून दिलेल्या 5 ते 10 कामगारांवर खालील कामे पार पाडताना पर्यवेक्षण करणे.<br>अ) शौच टाक्या<br>1) चेंबरचे झाकण उघडून उडून जाण्याऱ्या डासांवर किटकनाशक फवारणी करणे. प्रत्येक दिवशी 80 शौच टाक्या.<br>2) झाकणे उघडून पाण्यातील डासांच्या अळी अवस्था नष्ट करणे.<br>ब) नाले<br>1) लहान तसेच मोठया नाल्यातील कचरा बाजूला सारून अडथळा दूर करणे.<br>2) पावसाळी पाण्याची गटारे.<br>3) नाल्याच्या कडेवरचे गवत काढणे.<br>4) नाल्यातील पाण्यावर तरंगणारी पाणवनस्पती इत्यादी काढणे.<br>5) नाल्यात किटकनाशकाची फवारणी करणे.<br>6) दर आठवडयाला अदमासे 36 ते 48 कि.मी. लांबीच्या नाल्याच्या एका किनाऱ्याचे काम करणे, कारण रूंद नाल्याच्या एका किनाऱ्यावरून संपूर्ण नाला वाहता करून फवारणी होऊ शकणार नाही. |

| | | |
|---|---|---|
| | | क) गवताची कुरणे<br>1) मातीचे बांध फोडून साचलेले पाणी वाहते करणे.<br>2) आतील भागात तसेच लगतच्या नाल्यावर दाणेदार अळीनाशक फवारणे. (आठवडयाला अदमासे 100 एकर क्षेत्र) |
| | | ड) मक्षिका नियंत्रण<br>मक्षिका नियंत्रण कामावर देखरेख करणे.<br>1) परिसरामध्ये – दहा बादल्या भरून (100 लिटर) किटकनाशक द्रावण प्रति पाळी प्रतिदिन फवारणी करणे.<br>2) क्षेपण भूमी (डंपिंग ग्राऊंड)<br>दहा बादल्या भरून (100 लिटर) किटकनाशक द्रावण प्रति पाळी प्रतिदिन फवारणी करणे. |
| 8) | कामगार | शहर 1) कनिष्ठ अवेक्षक आणि 2 कामगार<br>उपनगर 1) कनिष्ठ अवेक्षक आणि 4 कामगार<br>अ) <u>टाक्या व पाण्याचे साठे परिक्षण / अळिनाशक कामगार</u><br>1) पाण्याच्या टाक्या व इतर साठे, जमिनीवरील सर्व साठे तसेच इमारत बांधकाम तपासतांना कनिष्ठ अवेक्षक व पर्यवेक्षकिय कनिष्ठ अवेक्षक यांना मदत करणे, अळिनाशक किटकनाशक फवारणी करणे तसेच त्या दिवसाच्या बीटचे जमिनीवरील पाण्याचे डासजन्य सर्व साठे तपासून फवारणी करणे.<br>2) सर्व प्रकरच्या डासांच्या प्रजाती शोधण्यासाठी क्रुसेड कार्यक्रमात सहभागी होणे.<br>3) उघडी पाण्याची गटारे, तरंगता तसेच इतर कचरा लांब दांडयाच्या फावडा अथवा काटयाने बाजूला सारून वाहती करणे.<br>ब) <u>हत्तीरोग नियंत्रण व गटार कामगार</u><br>वरिष्ठ क्षेत्र कार्यकर्त्यांच्या कामाच्या यादीत अनुक्रमांक 7-2 मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे काम करणे.<br>क) <u>धुम्रफवारणी कामगार</u><br>1) प्रत्येक कामगाराने प्रत्येक पाळीत 4 यंत्रे भरून फवारणी करणे. |

| | | |
|---|---|---|
| | | 2) विभाग पातळीवर धुम्रफवारणी यंत्राची देखभाल.<br>ड) <u>माशा निर्मुलन कामगार</u><br>1) क्षेत्रामध्ये – प्रत्येक कामगाराचे प्रत्येक पाळीमध्ये 10 बादल्या द्रावण (100 लिटर) फवारणी करणे.<br>2) डंपींग ग्राऊंड (क्षेपण भूमीवर) - प्रत्येक कामगाराने प्रत्येक पाळीमध्ये 10 बादल्या द्रावण (100 लिटर) फवारणी करणे.<br>इ) <u>मूषक कामगार</u><br>3) प्रत्येक मूषक कामगाराने त्याच्या विभागात (बिट) 30 वंडर रॅट ट्रॅप / पिंजरे लावणे व दुसऱ्या दिवशी तपासून त्यातील उंदिर पुढील विल्हेवाटीसाठी कार्यालयात जमा करणे.<br>4) प्रत्येक कामगाराने उंदरांची 200 बिळे दर दिवशी फावडयाने बंद करणे. तसेच अमिषे बनवून लावणे व विषारी धुराच्या गोळया दुसऱ्या दिवशी उघडलेल्या बिळात टाकून ठेवणे व बिळ बंद करणे.<br>5) क्षेत्रात परिस्थिती व गरजेप्रमाणे मोठया प्रमाणात (मास ट्रॅपिंग) पिंजरे लावून त्यात येणारे जीवंत उंदिर जमा करून विभागातील भंडारात पाण्यात बुडवून मारणे. |